सं. फौ. ख. क्र.४३/२०१८ निशाणी १२

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – उमेश भाऊराव म्हैसने

वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – देगांव, ता. बाळापुर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. घटना दि. १६.१०.२०१७ रोजी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास बाळापुर ते वाडेगांव रस्त्यावर बाळापुर न्यायालयाच्या समोर रस्त्यावर घडली होती. त्यावेळेस मी माझ्या घरी देगांव या ठिकाणी होतो. त्या दिवशी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास माझे चुलत भाऊ नामे श्रीकृष्ण शेषराव म्हैसने हे देगांव येथुन बाळापुर येथे स्टॅम्प खरेदीच्या कामासाठी गेले होते. त्या दिवशी अंदाजे १०.४५ वाजताच्या सुमारास मला बाळापुर येथुन एका व्यक्तीने फोन करुन कळविले की, माझे चुलत भाऊ श्रीकृष्ण म्हैसने यांचा अपघात बाळापुर न्यायालया समोर झाला आहे. त्यावेळेस मी लगेच घरुन बाळापुर येथे येण्यासाठी निघालो. त्यानंतर घटनास्थळावर पोहोचलो असता मला दिसले की, माझे चुलत भाऊ हे मृत झालेले आहेत. त्यावेळेस मला तिथे उपस्थित असलेल्या लोकांकडुन कळाले की, वाडेगांव येथुन बाळापुरकडे येणाऱ्या रस्त्यावर, बाळापुर न्यायालयाच्या समोर एका ट्रक चालकाने त्याचा ट्रक हयगयीने चालवुन माझ्या भावाच्या मोटरसायकलीस धडक दिली व त्यामध्ये माझा भाऊ रस्त्यावर खाली पडला व मरण पावला. तसेच त्या वेळेस त्या ट्रकने इतर दोन लोकांना सुध्दा धडक देवुन जखमी केले होते. सदर अपघाताची घटना मी प्रत्यक्ष पाहिली नव्हती त्यामुळे त्या ट्रकचा वाहन क्रमांक मला सांगता येणार नाही. त्यानंतर सदर घटनेचा मी बाळापुर पोलीस स्टेशन येथे जावुन रिपोर्ट दिला होता. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १३** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

त्यास **निशाणी क्र. १४** देण्यात येत आहे. सदर ट्रक चालकास मी कधीही बघितलेले नाही.

सरतपास पूर्ण.

(**सदर प्रकरणात आरोपी फरार आहे. मा. उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायालय यांच्या आदेशान्वये जुनी प्रकरणे निकाली काढण्याच्या उद्देशाने सदर प्रकरणातील साक्षीदाराची साक्ष फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अंतर्गत नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे उलटतपास राखीव**.)

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

समक्ष

NARESH SOMA BARI

Digitally signed by NARESH SOMA BARI
Date: 2026.07.15 17:20:32 +0530

बाळापूर. (एन. एस. बारी)

दि. १५/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.